दिनांक : १२ .०४ .२०२२

# *प्रिझम फौंडेशन संचलित लार्क ( संमिश्र अपंगत्व )*
# *वार्षिक अहवाल २०२१ -२०२२*

दि . १४ .१२ .२०२१ रोजी प्रिझम फौंडेशचे संस्थापक विश्वस्त श्री . वाय .जी .पटवर्धन सरांचे दु:खद निधन झाल्यामुळे दि . १५ .१२ .२०२१ रोजी शाळेचे कामकाज बंद ठेवण्यात आले होते .

यावर्षी शाळेत एकूण २४ विद्यार्थी असून मुख्याध्यापिका, ५ शिक्षक, ४ मावश्या कार्यरत आहे .

शिक्षक

- दि . १४ जून २०२१ पासून मुख्याध्यापिका स्वाती सगम, शिल्पा लोंबर, प्रतिभा मुळे, सायली भावे, जयश्री कोकणे व विकास जगताप यांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण घेतले . तसेच विद्या भागवत यांनी सहा विद्यार्थ्यांचे ABT ॲक्टिव्हिटी सेशन्स घेतले .

ISO

- दि .२७ .०८ .२०२१ रोजी Internal Audit संचालिका हर्षा मुळे यांनी घेतले .
- दि . २० .११ .२०२१ रोजी ISO चे Surveillance Audit झाले .
- दि . २४ .०२ .२०२२ रोजी Internal Audit हर्षा मुळे यांनी घेतले .

अभ्यासक्रम

- सर्व विद्यार्थ्यांना ई-मेल व WhatsApp Online Group व्दारे अभ्यासक्रम व सूचना पाठविण्यात येत होत्या .

उपक्रम

- दि . १ जून २०२१ रोजी प्रिझम फौंडेशन स्थापना दिन ट्रस्टी, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला .
- योगा दिना निमित्त दि . १९ जून २०२१ रोजी शाळेत येवून सर्व शिक्षक, मावशी व काका यांनी योगासनाची प्रात्यक्षिके केली . याचा व्हिडीओ विद्यार्थ्यांना दि . २१ जून रोजी पाठविण्यात आला . यासंपूर्ण आठवडयात विकास सरांनी सर्व विद्यार्थ्यांकडून योगासने करू घेतली .
- दि . ०२ .०७ .२०२१ रोजी पालखी कार्यक्रमाची YouTube link विद्यार्थ्यांना पाठविण्यात आली होती .
- दि . ०३ .०७ .२०२१ रोजी पालखी कार्यक्रमाची zoom link व्दारे साजरा करण्यात आला . विद्यार्थ्यांनी काही कार्यक्रम सादर केले .

- दि. २२.०७.२०२१ गुरूपौर्णिमे निमित्त आपल्या तासाप्रमाणे 'निसर्ग हाच गुरू' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेतली. तर दि. २३.०७.२०२१ रोजी गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम zoom link व्दारे साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी काही कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमानिमित्त मावशी काकांनी ही कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

- दि. ०२.०८.२०२१ रोजी टिळक पुण्यतीथीचा ऑनलाईन कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर शिक्षकांनी सेशन्स मध्ये पाढे पाठांतर स्पर्धा घेतली.
- दि. १५.०८.२०२१ रोजी शाळेत झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संस्थेतील ट्रस्टी व शिक्षक उपस्थित होते.
- दि. १९.०८.२०२१ रोजी राखी पौर्णिमेनिमित्त ऑनलाईन चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.
- दि. ०६.०९.२०२१ रोजी कै. कमलाबाई गोडबोले आंतरवर्गीय कविता पाठांतर स्पर्धा घेण्यात आली.
- यावर्षी कै. कमलाबाई गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ६ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुण्या व परिक्षक म्हणून मा. माधवी सॅम्युल यांना बोलविण्यात आले होते. सहभागी विद्यार्थ्यांनी पाठविलेले व्हिडीओ दि. २४.०९.२०२१ रोजी परिक्षकांना दाखविण्यात आले. त्याप्रमाणे बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाची YouTube link दि. ३०.०९.२०२१ रोजी upload करण्यात आली आहे.
- दि. २२.१०.२०२१ रोजी कन्सन इंडिया तर्फे 'स्टोरी टेलिंग' या ॲक्टिव्हिटीमध्ये शाळेतील ९ विद्यार्थी सहभागी झाले होते.
- दि. २२.१०.२०२१ रोजी दिवाळी पार्टीची लिंक विद्यार्थ्यांना पाठवून दिवाळी साजरी करण्यात आली.
- दि. २६.०१.२०२२ प्रजासत्ताक दिन संस्थेत साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. प्राजक्ता कोळपकर यांच्या हस्ते वार्षिकांक 'तमोहर' चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सर्व स्टाफ उपस्थित होता.
- दि. २५.०२.२०२२ रोजी मराठी दिना निमित्त विद्यार्थ्यांचे वाचन लेखन घेण्यात आले.
- दि. २८.०२.२०२२ रोजी विज्ञान दिना निमित्त विद्यार्थ्यांनी विविध प्रयोग केले.
- दि. १३.०४.२०२२ रोजी आनंदमेळा साजरा करण्यात आला.
- दि. १४.०४.२०२२ रोजी विज्ञान प्रयोग व विविध कलाकृतीचे ऑनलाईन प्रदर्शन YouTube वर upload करण्यात आले.

स्नेहसंमेलन

- यावर्षी स्नेहसंमेलनाचा विषय 'पंचमहाभूते' असा ठरविला होता. प्रॅक्टिस साठी विद्यार्थ्यांना दोन दिवस शाळेत बोलविण्यात आले होते. विद्यार्थी खूप खूष होते. दि. २१.१२.२०२१ रोजी स्नेहसंमेलनाचे शूटिंग शाळेत करण्यात आले. दि. ०४.०१.२०२२ रोजी स्नेहसंमेलनाची YouTube link सर्व पालकांना पाठविण्यात आली आहे.

सेफ्टी ड्रील

- दि. १२.०८.२०२१ व ०८.०३.२०२२ रोजी सेफ्टी ड्रील घेण्यात आले.

परिक्षा

- तिमाही, सहामाही, नऊमाही परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली.
- परिक्षेचे निकाल WhatsApp व्दारे पालकांना पाठविण्यात आले.
- दि. ०९.११.२०२१ ते दि. १३.११.२०२१ रोजी पर्यंत इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा शाळेत घेण्यात आल्या. यावेळी गटातील ३ विद्यार्थी उपस्थित होते. एका विद्यार्थ्याने ऑनलाईन परिक्षा देवून उत्तरपत्रिका

PDF व्दारे पाठविल्या होत्या. या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार करणे व तपासून देणे यासाठी रेडक्रॉस शाळेतील शिक्षक श्री. प्रशांत गडदे सर यांनी सहकार्य केले. तसेच हिंदी विषयाच्या प्रश्नपत्रिका तपासण्यासाठी फिनिक्स शाळेच्या शिक्षिका प्रमिला पुकळे यांनी सहकार्य केले.

- दि. ०४ ते दि. ११.०१.२०२२ या कालावधीत ओपन बोर्ड स्कूल इ. ५ वी ची परिक्षा झाली.
- दि. ०६ ते दि. १२.०४.२०२२ रोजी पर्यंत वार्षिक परीक्षा शाळेत घेण्यात आली.

बाहेरील स्पर्धा

- दि. १८ जून २०२१ रोजी कर्न्सन इंडिया तर्फे भेळ व चॉकलेट मिल्क शेख बनविणे स्पर्धेत शाळेचे ११ विद्यार्थी सहभागी झाले होते.
- दि. २०.०७.२०२१ रोजी पालखी निमित्त बालकल्याणने फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत शाळेतील ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.
- दि. २०.०७.२०२१ रोजी गुरूपौर्णिमेनिमित्त बालकल्याणने वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत शाळेतील एका विद्यार्थ्याने सहभाग घेतला.
- दि. २८ व दि. ३० ऑगस्ट २०२१ रोजी S.O.B ने आयोजित केलेल्या टेबल टेनिस स्पर्धेत शाळेतील एकुण ७ विद्यार्थ्यांनी व ऑफलाईनच्या १ विद्यार्थ्याने सहभाग घेतला होता.
- दि. २०.१०.२०२१ रोजी SOB तर्फे घेण्यात आलेल्या स्केटिंग स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी रूचित नेहते सहभागी झाला होता. हा विद्यार्थी सध्या ऑनलाईन शाळेसाठी सहभागी नाही.
- दि. १४.१२.२०२१ रोजी सोहम योगसंघा तर्फे घेण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत सहभाग घेतला. श्रध्दा कामेरीकर हीला प्रथम बक्षिस मिळाले.
- दि. २९.०३.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत शाळेतील ५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रथम क्रमांक श्रध्दा कामेरिकर व व्दितीय क्रमांक मानस कुलकर्णी या विद्यार्थ्याला मिळाला.

पालक सभा

- दि. १०.०७.२०२१ रोजी पालक सभा घेण्यात आली.
- दि. १८.०९.२०२० रोजी पालकसभा घेण्यात आली. पालकांना तिमाही अहवाल देण्यात आला.
- दि. २०.१०.२०२१ रोजी पालक सभा घेण्यात आली.
- दि. २६.११.२०२१ रोजी स्नेहसंमेलना संदर्भात पालकांबरोबर ऑनलाईन मिटिंग घेण्यात आली.

कार्यशाळा

- दर महिन्याच्या तिस-या शनिवारी संचालिका हर्षा मुळे यांनी मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका व ऑफिस स्टाफ यांच्यासाठी 'व्यवस्थापन कौशल्या', 'वेळेचे व्यवस्थापन' व नियोजन या विषयावर कार्यशाळा घेतल्या.

बाहेरील कार्यशाळा

- दि. ०३ व दि. ०४.०३.२०२२ रोजी बालकल्याण संस्थेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय प्रथमोपचार शिबिरास शाळेतील सेविका सविता कदम या सहभागी झाल्या होत्या.

बेन्यू टीचर ट्रेनिंग / पालक कार्यशाळा

- बेन्यू तर्फे शिक्षकांचे इन हाऊस ट्रेनिंग सुरू करण्यात आले आहे.
- वर्षभर बेन्यू तर्फे ऑनलाईन पालक कार्यशाळा घेण्याचे ठरल्याप्रमाणे विद्या भागवत यांनी Motor skills, 'कौशल्यपूर्ण जगणे', ' बहुआयामी बुद्धिमत्ता' या विषयावर पालक कार्यशाळा घेतल्या.

मिटिंग

- दि . १२ .०७ .२०२१ रोजी संचालिका हर्षा मुळे यांनी मुख्याध्यापिके बरोबर शाळेच्या कामकाजाविषयी ऑनलाईन मिटिंग घेतली .
- संचालिका हर्षा मुळे यांनी वर्षभर पुढील मुद्यांवर मिटिंग घेतली - कै . कमलाबाई गोडबोले कविता पाठांतर स्पर्धेसंबंधी, दिवाळी सुट्टी, दिवाळी नंतर शाळा सुरू करणे, शाळेचे गॅदरिंग विषय व तारीख, स्नेहसंमेलन, तमोहर व २६ जानेवारी, पुढील वर्षच्या नियोजनाबाबत थोडक्यात चर्चा झाली . वार्षिक परिक्षा वेळापत्रक तयार करणे, २०२२ - २०२३ चे कॅलेंडर तयार करणे, वाचन दिन, मराठी दिन, विज्ञान दिन साजरे करणे, शैक्षणिक सहली करणे, वहातुक व्यवस्थेविषयी माहिती देणे . बजेट पूर्ण करून अकांउट डिपार्टमेंटला देणे, एप्रिल महिन्यात शाळा सुरू करणे, पुढील वर्षीसाठी पालकांना पत्र तयार करणे . वार्षिक परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना शाळेतच बोलविणे, पुढील वर्षीच्या अभ्यासक्रम संदर्भात, शाळेच्या युनिफॉर्म संदर्भात,
  फी शिल्लक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधून पुढील ॲडमिशन संदर्भात बोलणे, ऑफलाईन विद्यार्थ्यांना पत्र पाठवून पुढील ॲडमिशनबाबत विचारणा करणे
- दि . २९ .०१ .२०२२ रोजी शिक्षकांबरोबर पुढील अभ्यासक्रमा बाबत
- दि . १७ .०२ .२०२२ रोजी संचालिका हर्षा मुळे यांनी मावशी काका बरोबर पुढील वर्षासंदर्भात
- दि . २१ .०३ .२०२२ रोजी शिल्पा लोंबर, सुवर्णा वाबळे यांच्याबरोबर कॅन्टीन स्नॅक्स नियोजन संदर्भात
- दि . २४ .०३ .२०२२ रोजी बेन्यू तर्फे घेण्यात येणा-या इन हाउस ट्रेनिंग, पालक कार्यशाळेबाबत चर्चा
- ऑफीस स्टाफ बरोबर कामाचा आढावा घेवून पुढील कामा संदर्भात मिटिंग घेतली .

संपर्क

- दि . २३ .०३ .२०२२ रोजी पुढील वर्षा करिता कांचन ड्रेसेस व कल्पना साडी सेंटर मध्ये स्कूल युनिफॉर्म साठी व सागर फूटवेअर मध्ये शूज साठी संपर्क करण्यात आला आहे .
- दि . २८ .०३ .२०२२ रोजी बालभारती येथे भेट देवून नविन पुस्तकां बाबत चौकशी करण्यात आली . मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात नविन पुस्तके येतील तेव्हा शाळेला कळविण्यात येईल .

इतर

- पुढील ॲडमिशन संदर्भात १६ पालक भेटून गेले आहेत .

स्वाती सगम
मुख्याध्यापिका
लार्क